# प्रकरण पाचवे

## " तहान " मधील भाषाशैली

या प्रकरणात " तहान " या कादंबरीची भाषा शैलीचा अभ्यास करण्याचे योजिले आहे. प्रत्येक कलावंताचा जसा एक खास पिंड असतो तशीच निर्मितीची एक शैली असते. भावना व विचार व्यक्त करण्याचे साधन म्हणजे भाषा होय. लेखकानुसार भाषा बदलते. त्याचप्रमाणे कादंबरीतील पात्रे, निवेदन व संवाद यानुसार भाषा बदलावी अशी अपेक्षा असते. भाषा ही गोष्ट कादंबरीत महत्वाची मानली जाते.

प्रादेशिक कादंबरीत भाषा ही अत्यंत महत्वाचा घटक असतो. ज्या प्रदेशात कथानक घडत असते त्या प्रदेशातील भाषा वापरणे वातावरण निर्मितीच्या दृष्टीने महत्वाचे होऊन बसते. प्रादेशिक भाषा केवळ संवादापुरती आवश्यक नसून कथानकातील निवेदनासाठी तिचा योग्य त्याप्रकारे उपयोग करणे गरजेचे असते.

"तहान " या कादंबरीतून कोणती भाषा संवादासाठी व निवेदनासाठी वापरलेली आहे ? प्रसंगवर्णन, घटना प्रसंग, व संवाद लेखन लेखक कसे करतो ? " तहान " कादंबरी प्रादेशिक कादंबरी ठरते. का ? या सर्व प्रश्नांचा शोध या ठिकाणी घ्यावयाचा आहे.

## घटना प्रसंगाचे वर्णन :

" तहान " कादंबरीतील घटना प्रसंगाचे वर्णन करताना ती घटना किंवा प्रसंग आपल्या निवेदनानी वाचकासमोर जीवंत करताना देशमुख यांची भाषा अनेक रुपे धारण करते. शैली चित्रणात्मक होते. प्रसंग निवेदन करताना त्या घटनेतील बारीक सारीक सर्व माहिती

वाचकासमोर येते. उदा. " तिकडून गावाच्या डोंगरतळं...गावखोरी आग लागली. तिथं लोकायच्या वैरणीच्या बुडी रचून ठेवल्या व्हत्या. त्या पहयले पेटल्या, अन् मग राकेसावाणी आगीचा भडकाचं भडका झाला. ज्यो त्यो बायका पोराला घेऊन पळाला. आग इझवायची तरी कशी ? पाणी तरी कुठून आणायचं ? घरात प्यायले पाणी नाई. माती फेकून पाहयली पण ती थोडी काई चूप व्हती इजायले. इजलीचं नाही वापर...ढोरं, गायी, बकऱ्या मेल्या...पण जास्त करून कामाचे बैलचं मेले. कावूनं की बेकाम जित्राब चरायले जायेल व्हतं रानात. ते वाचलं...बाकीचं समदं जळनं आयचं...आता आमी तरी काय करावं जगून ? आमालेबी धा फेकून आगीत

म्हातारा थरथर कापत वेड्यासारखा किरकला...ऐकणारी मन कासावीस झाली सारंगपूरच्या लोकांची गर्दी झाली होती. पण ते काहीच करु शकत नव्हते. सगळं संचीत जाळून गेलेल्या माणसांसाठी काहीचं न जळालेली माणसं शब्दाचं दान देऊ पहात होती. पण ते शब्दही आतल्या आत कुठंतरी जळून कोळसा झाले होते. धुरवटून गेले होते.' एकूण चित्रणातून प्रसंग सर्व तपशिलासहीत देशमुख जीवंत करतात. यासाठी वापरलेली भाषा त्याच प्रदेशातील असल्यामुळे प्रसंग अधिक उठावदार होतात. ही गोष्ट कादंबरीत जागोजाग आढळते. त्यामुळे कादंबरीतील सर्वच घटना, प्रसंग जीवंत व चित्रमय होतात. यामुळे कादंबरीचे यश दुणावते.

## समुदायाचं वर्णन :

" तहान " मध्ये घटना, प्रसंग जसे जीवंत होतात तसेच समुदायाचे वर्णन लेख चित्रमय पध्दतीने करतो. समुदायाचं वर्णन करताना लेखक प्रत्येक मनुष्याची हालचाल चित्रित करण्याचा प्रयत्न करतो त्यावेळी तो कोणत्या अवस्थेत आहे, याची बारीक तपशील येतात. ~~प्रसंगी~~ स्थितीनुसार निवेदन आढळते. उदाहरणार्थ कार्यालयासमोर पोलीस उभे होते. त्यांच्याही अंगावर, डोक्यावर मडके घेऊन फुटतं होते. काय करावं त्यांनाही थोडावेळ कळेनासं झालं. आणि मग ठाणेदाराने हुकूम सोडला.. "लाठी चार्ज."

तसे हातातले दंडुके सरसावत पोलिस पुढे झाले. मिळेल त्याला झोडपून काढायला लागले. ज्यांच्या अंगावर, पायावर, डोक्यावर दंडुके पडायला लागले, ते मरणाचे ओरडू लागले. गावातल्या बायका घागर मोर्चा घेऊनं आल्या होत्या, त्या आता माय वं आता बाई वं अशा भयानक केकाटत वाट सुटेल तिकडे पळायला लागल्या पदराचं, नेसल्या लुगड्याचं भान नाही, अशा सैरभैर झाल्या. काही लुगड्याच्या घोळात पाय अडकून तोंडावर पडू लागल्या. त्यांच्या जवळची बारकी-चिरकी पोरं रडाय बोंबलाय लागली.

सगळे लोक मार खाता खाता एकमेकांच्या अंगावर आदळत, आपटत गल्ली बोळातून गावभर पळायला लागले. पोलिस मागे आहेत किंवा नाही, वळून पहायलाही सवड होत नव्हती. दार उघडं असलं त्या घरात माणसं रस्त्यावरून पळताना घुसत होते. लपण्या साठी घरातील कणग्यां-शी, घडवंच्या खाली दडून बसत होते. आता घराची दारं सुध्दा धडाधड बंद व्हायला लागली होती. बंद दारांना आत धक्के देऊनं, आता कुठं

जाव ? असा भयग्रस्त विचार करत माणास दूर शिवारात पळत होती. सगळ्या गावातच थरारून टाकणारी घबराट निर्माण झाली होती. मोर्च्यात सहभागी झालेला प्रत्येक जीव भेदरून गेला होता. आता पोलीस आपणास पकडून नेणार, झोडपून काढणार, असं प्रत्येकाला वाटतं होत. मांजर मागे लागलेल्या उंदरासारखे माणसं दडून बसली होती.[२] निरनिराळी माणास कशी वागतात, समूह म्हणून त्यांचे अस्तित्व कसे असते त्यांच्या प्रेरणा, प्रवृत्ती शब्दशब्द करण्याचा लेखक प्रयत्न करतो व समूह आपल्या समोर जीवंत करण्यात यशस्वी होतो.

मनाचे अंतःरंग चित्रण करणारी भाषा :
---

" तहान " मध्ये घटना, प्रसंग समूह यांची चित्रणे जीवंतपणे केलेली आहेत. त्या बरोबरच बाह्य चित्रणासोबत व्यक्तीचे अंतरंग लेख तितक्याच ताकदीने चित्रित करताना दिसतो. यामध्ये त्यांच्या भावभावना पात्राच्या मनातील आंदोलने, त्यांच्या मनातील कोणते विचार, विचारांची गुंतागुंत लेखक चित्रित करतो हे चित्रण करण्यासाठी लेखकाला पात्रांचे आकलन असावे लागते. ते देशमुख यांना आहे. उदा. बबनच्या मनात काहुर माजतं, गावात टँकर आला तर पाण्या-साठी पैसे कोण मोजेल ? मनातील चीड व्यक्त करण्यासाठी तो बैलांना काठी हाणू लागतो. आपल्या कमाईवर जळणाऱ्या लोकांसाठी तो बैलांना धामाधुम होत मारु लागतो. पण त्याचं मन स्थिर नाही. " काम करु करु खायाले फुरसंत भेटत नाई. त्यापायी त्याहयेवढा गबदुल्या अंगाचे आता तांगाडे झाले. खरं, आपुन लय हरामी हाये. मुक्या जनावराची हेळणा सायली. आपल्याले हे पाप या जल्मी अन् उरलूर पुढल्या जल्मीबी भोगावं लागल... जबल तू आपल्याले ढोराचा जलम भेटलं पुढचा...हमालाची गाडी ओढावं लागलं बाजाराच्या ओढा मार्केटातल्या... या विचाराने तो झाला

या चित्रणातून बबनचे अंतरंग वाचकासमोर येते. असेच बबनच्या वडलांचे अंतरंग लेखक चित्रित करतो. उदा. काय वचवच बोलायला लागली ही धांगड...कुठून आला जिभेला एवढा जोर ? कसे काय फुटले जिभेला काटे ? पहयले त कधीच आंस बोलत नव्हती. सकाळ पाहयटची न्यायरीले ताज्या भाकरी कडून देत नाई. राच्याचं शिळ्या भाकरी नेवावं लागतात. मातमी, हाताखातून काढावं त, ते बी बरं दिसणार नाई. पोरंग जवानं झालं, पोरगी उजावं आली... असे सर्व पात्राचे अंतरंग या कादंबरीत समर्थपणे चित्रित होते.

## संवाद लेखन :

कादंबरीत संवाद लेखनाला फार महत्व आहे. संवाद लेखनातून पात्राचा स्वभाव कळू लागतो. पात्राच्या मनात नेमके काय चालले आहे ते समजू शकते. कादंबरीत प्रसंगानुसार किंवा घटनानुसार संवाद होत असतात. त्यामुळे संवादातही फरक जाणवतो. रोमँटिक स्वरूपाचा, उपहासात्मक संवाद, कधी सामाजिक संवाद, घरगुती स्वरूपाचा संवाद हा फरक वेगवेगळ्या ठिकाणी प्रत्येक ठिकाणी दिसत असतो. त्या लेखकाची शैली वेगळी असणे गरजेचे असते, हे वेगळेपण तहानमध्ये जाणवते. उदा.

" कशी दिसती साडी ? तुमच्या दोनसे रूपायाचोहाये ! "
"अरे वा ! तरी मी म्हणतो की, आज कशी हिरोइनसारखी दिसाय लागली "

'म्हणताना त्याने तिचे दोन्ही दंड धरले अन् तिला आपल्याशी ओढलं, तिने ही त्याला ओढू दिलं. त्याच्याशी तोंडातल्या द्राक्षाच्या फळासारखी विरघळली.'

" आज नाई दूर पळाली "
" किती दिवस दूर पळायचं ? तुमी मपली किती काळजी घेता..

" किती दिवस दूर पळायचं ? तुमी मपली किती काळजी घेता.. पाणी देता गाडीले पैसे देता...

" आशा शंभर साडयानं झाकीन टाकीन तुले म्हणताना त्याने खिशात हात घातला. अन् मूठभर नोटा तिच्या हाती कोंबल्या.

" आता माय बाई ! एवढे पैसे ? "[४]

दुष्काळाच्या चाहुलीने हादरलेली गावातली माणसे म्हणतात. आमदार-खासदार, लोकांचे दौरेही नाहीत.

" आशा टायमाले दौरे बी येत नाईत आमदार-खासदार लोकायचे.."

" आता दौरे कशाल काढतीनं ते ! ए.सी. अन् कुलरचा गारवा सोडून "

" नाई पण या लोकपरती निधीयले एकदा आणावंच इकडच्या भागात हिंडू धाव जरा मडके घेऊन, त्याहयले काय, भेटतं असल बक् बक् नळाच्या धारीचं पाणी. आपला मतदार संघ इकडी केविलवाणी "[५]

बायको मुलाच्या ओढाताणीत राघोजी शेवाळे मात्र संतापतो आहे.

" कावून आसं कावरल्यासारखं कराय लागले ? काय झाल ? "

" आरे मपले बैल कुठी हायेत ? मुरल्या कबिल्या कुठी हायेत ?

"कुठी हायेत म्हन्जी ? बबनराव नेले न गाडीले जुपून...?

" इतक्या उनातानाचे ? "

" ते का पघळतात का उनात ? ते का लोण्याचे गोळे हायेत का ?

" आरे तुमच्या मायशी...काय खाटकाच्या घरचे हाये का बे तुमी ? आरे उनातानाचे एवढया अवघड वाटेनं नेता जुपू जुपू...आशानं त मोडायचे एखाद्या फऱ्यातून. ते माहे बैल का भाडयाच्या गाडीचे हायेत का ? माहं बावर पोसणारे, घर खाजगीतले ओताफाटयाचे बैल हायेत ते. "[६]

प्रमोद नवलेचा पाण्यामुळे संसाराचा गाडाचं थांबतो तो म्हणतो " आठ रोजापासून मपला संसार बंद हाये, हया पाण्यापायी आंघोळच बंद हायेत. पुलावरच्या हापशीचं प्यायपुरतं पाणी कसंतरी घरातले आणतात... म्हणून कोणाचं आंघोळ करायच्या नाईत असं फर्मानं काढल आमच्या म्हातारीनं..."

" पण त्याचा तुझ्या संसाराशी काय संबंध ? "

" आरे बाबा, बायको हात लावू देत नाई अंगाले, तशाच मचाळ अंगान दिवसभर काम कराये लागते. सयपाकं कराव लागते. ते मचाळ वाटते म्हन्ती. कावून की लगन झाल्यापासून उठल्याबरोबर निर्मळ चिर्मळ आंघोळ करायची सवय लागेल हाये तिले ती आता आशी गंजाय लागली मले."[७]

घटना किंवा प्रसंग ज्याप्रमाणे असेल त्याला अनुरूप असे संवाद लेखक लिहितो. त्यामुळे व्यक्ती भाषेची लेखकाची भाषा प्रकट होते. स्त्री-स्त्री, संवाद, पुरूष-पुरूष, बाप-मुलगा नवरा बायको मित्र-मित्र गिन्हाईक-विक्रेता

" दातखिळी बसली. कांदा आणा...खेटर हुंगायले या..

" दवाखान्यात न्या...डाक्टरले आणा..

"मेली का काय शेवंताबाई ?..आवाज उठले.

काय माय हया पाण्यापायी आकात आला । "

" गेला माय चालता बोलता जीव.. आंजुळभर पाण्यासाठी...

असं बायका-माणसं बोलायला लागले.[८]

"स्त्री-स्त्री संवाद लेखक प्रभावीपणे चित्रित करतो.

त्या एकडांग्याच्या पाझर तलावावर गदूळ पाणी तुंबले हाये. ते तरी एक बरं हाये वरपाय कामी ये ढोरायले..."

" पण ते तरी किती दिवस पुरणार हाये ? ते आटल्यावर मंग कसचं व्हावं ? गायमाळात हौद हाये. पण तिथी बैल पाणी पाजायेल

न्याव त वावरातले कामं कधी करावं ..दोन कोसावर बैल नेण्या आणण्यातचं दिवस सरुन जायाचा..."

" मग वावरातले काम करायचेच नाई आता. ."

" अन् वावंर पडीत पाडायचे...फाशा घेऊन मरायचं " [९]

" अरे ओ बावाच्या नाना. .त्या दिवशी तुवा कडबा आणला त ताटी लावली नव्हती वाटते बरोबर. .

" कावून ते। काय झाल ? "

" तुहं नाक झालं...सम्दा चारा घोळा ढोरायनं...खाना खराबा सत्यानास केला. जाऊन पाहय जरा."

" आता तिथी का जागलं जाऊन बसू का मी. नासुकल्या कडब्यासाठी. हजार रुपयात भक्कम चारा भेटते. कळमगावले घेऊन येऊ गणेशराव भाऊचं टॅक्टर नेऊन त्याच्यासाठी कशाले जिवाचा घोळसा करुन घेता एवढा ?"

" तयेच पैशावाला झाला दिडा दिवसांत. माईंत हाये नं मले, घरचा एवढा चांगला चारा का मोकाट ढोरायसाठी राखून ठेवला का म्या. झोपाट लावू नवतं काळजीन?" [१०]

.. हया दिडादिवसाच्या धधापायी शानशौक करते. हाटेलीत खाते...अन् माहे सोन्यासारखे बैल का मारुनं टाकते का म्हणाव ? आता उधा लाव म्हणा बैलायले कसा हात लावतू ते...

" कावूनं शिव्या घायले लागले हो ? कावून कुरकूर लावली अंडयावर बसल्या कोंबडीवाणी ? असं रामकोर म्हणाली.

" तू चूप बैस व खेकडछाप...मायची घुबडतोंडी तुह्या जवा पहाव तवा बचबच तोंड खपसत राहती माणसाच्या मंधात. जास्त नखरे करशील तर कुचकूनच टाकीन तुले उभारीच्या एका रपटयात. लयचं तोंडाळ झाली तू, नाई का ? लयच तोंडाळ झाली तू ..." [११]

साल, लय पैसा कमावूनं राहयलं दे फरेतर, सम्दे नवकरीवाळे यांच्याकून पाणी इकत घेतात. कावून की ते गावातल्या बंगाटेल हापसीवर नंबर लावू शकत नाईत. रातरातभर जागून इहिरीचं घोट घोट पाणी काढू शकत नाई. आपल्या बायकासारख्या आरकाट नसतात न त्याहयाच्या बायका... नाजूक असतात. त्याहयच या भरोशावर मजा हाये बबन्याची.

" लय नोटा कमावते, पाहयलं त खुरपे हाये सालं, वखरा-नागरा बिगर काई माईत नवत इलक्या दिवस पण आता पानपट्टीवरचा खर्रा खाते सी अन् माणिकचंद गुटका खाते, ढाब्यावरची पाहयलं कोंबड खाताना जगण्याच्या...?

" आपून बी. ए. होऊन आपली कमाई काय, त चाळीस,पन्नास रूपये...ते बी कधी हायेत कधी नाईत...अन् हे धमकट् तीन चारशे त सहज कमावत आसलं...जास्ती पण कमी नाई..."[12]

" अशी गाडी बनव टापटोटाप पाणीबी भक्कम आलं पाहयजे, अन् बैलायलेबी सोपी गोली पाहयजे."

" तू बिनघोर राहय बबन आता, लय लाखोंडाच्या गाडया बनवेल हायेत म्या..."
ते का मले माईत नाई ? पण टागरच्या चाकाची गाडी पहयलीचं बनवून राहयला नं म्हणून म्हन्लं ।"

" तुले काय सांगू, गपल्याचं तोंडानं गपलं, पण चान्स आला त., मोटारी, जीपकारीची बनवू शकतो आपून, तू गाडीचं काय सांगून राहयला ? "

" शिकेल माणसाचं डोक्सचं आलक चालते, अन् मी काय नासुकला बारावी...तू बी. ए. माह्यापेक्षा तुपरच चालणार हाये बुध्दी

" ते शिक्षणाचं जाऊ दे...पैशाविगर काई खरं नाई. पैसे असते त आज साहेब झालो असतो. ही बोकाठाकी अन् जोडाजोडी नसती करावं लागली. ते शिक्षणाचं बोलून खपली नको काढत जाऊ तू मपल्या काळजाच्या जखमेची."

" बरं! चुकलो बाबा !"

" पैसे किती हायेत हे ?"

" दहा हजार !"

" आणि दोन तीन हजार लागतीलच."

" तू पैशाची चिंता नको करु. फक्त काम लवकर कर. आठ दिवसाच्या आत."

" बिलकुल ! सम्द मटेरियल रेडी हाये मपल्याजवळ !

" जातो मग !"[13]

घटना प्रसंगानुरुप असे संवाद लेखक लिहितो, त्यामुळे संवादातील वेगळेपण जाणवते.

## प्रसंगानुरुप शिव्या :

काही ठिकाणी प्रसंगानुरुप शिव्यांचा वापर केला आहे. शिव्यामुळे संवादाला एक ठोसपणा आल्याचे आढळते ते पात्र राग व्यक्त करते.

लेका मरणाचा चढ हाये पिराचा...बैलाची बेल्डी तून व्हती अंटा[14] आरे तुमच्या मायगी..काय कुटकाच्या पोटचे हाय का बे तुमी.[15] या राजांत काईच पाणी नाई रे बटकिच्यायहो[16] नाटकीचा पैसा माणसाले एवढ बदलवते[17] चूप बैस बक बक नको करु रांड.[18] करते लेकाचे आता मपल्या बैलायचा चक्कनाचूर...मायगी यांच्या[19] कावून उशीर लावला रे बबनं..लेका, किती वाट पाहून राहलो तुमची.[20]

मायमी हया बबनच्या किती कमादूनं चाक लागलं हे बैलायच्या पायले.[२१] लेका बापाले मारतू ? खोते गुण सुचायला लागले का ?.. लाज नाई वाटतं.[२२] ताती कमाईच काय हाये आपली.[२३] सालं, लय पैसे कमावूनं राहयलं हे फोतर, हरामखोर एक रुपया कमी घेत नाई.[२४] हात लेका तुले लस्सी आणायले पाठवलं त ही बातमी होऊनं आला का काळजिभ्या.[२५] काढा लेकाचहो...तुमी झोपा काढा?[२६] मायमी, या सरपंचाले काईचं लाज नाई.[२७] लेका बहयताडा.[२८]

गेला लेकाचा बबन्या, दूर गेला.[२९] लेकाय हो समपायच्या डोळयातं महा पैसा येते.[३०] गे भुसारी काई च्युतम् सल्फेट माणूस नाई, लय धोरणी माणूस हाये त्यो.[३१] पेटरं हाणायले पाहयजे साल्याले [३२] लय मतलबी हाये लेकाची माणसाची जात.[३३] इतक्या पाहयटीच कुठी गेला मनतात?[३४] काई च्याटा मारतू का साल्या..[३५] कर मर लेकाच्या पाणी तिकडी आमच्या फटफटीचवळ ये...[३६] चल बे झाले...बैल ते बाप... बस झाले नाटक साल्या इकडी माहयाजवळ ये...[३७] आता पायात पडतू भडव्या...साल्या...[३८] मग कावून नाई देत बे टवळया पाणी..[३९] ये साल्या. तुले बी खतम करून टाकतो..[४०] काय झाल नं! रिकामीच कावून बोबंलत आली ?[४१] तुमी का बांगडया भरल्या का मग हिजडयायहो[४२] बोयको बोडी नुस्ती बडबड करती पिसाळल्यावाणी.[४३]

या शिव्या निवेदनाच्या ओघात येतात. यामुळे या अस्थाई वाटत नाहीत किंवा लेखनाचा प्रवाही पण खंडित करीत नाहीत. उलट लेखकाची प्रादेशिक भाषेची जाण प्रकट करतात. त्यामुळे कादंबरीचा आर्थिक सौंदर्य वाढते.

## उपमा :

" लहान " कादंबरीत उपमाचा वापर केल्यामुळे भाषेला एक प्रकारचे सामर्थ्य प्राप्त झाले आहे. पण त्या उपमा वापरताना लेखकाने प्रदेशाचे भान ठेवले आहे. उदा. झाडाचे आंबे हलवून आणल्यावाणी तुमी आणले कधी एवढे पैसे..[४४] तिचा भेसुर आवाज ऐकणा-याच्या काळजावर ओरखडा उटवतं होता.[४५] गावरानं जवारीले रसायनीक खत देल्यावाणी...[४६] दिवारभर भग्न उदासीनतेच्या लाटांवर लाटा हिंदकळत होत्या..[४७] या बब-याच्या पैशानं तिच्यात अन् आपल्यात झळयाभोवळयाचं नात केलं.[४८] त्याच्या मनाले पिसारे फुटले थुई थुई नाचावं वाटतं होत. [४९] मस्तकात मुंग्या दाटून बधिरला होता. आधीच गाव रोगट टी.बी. झाल्यावाणी विजूर...त्यानं हे भदाडं गावाच्या अंगाले [redacted] जखमाचं जखमा [५०] त्याचं बोलणं ऐकलं आणि बबनच्या मनाचा घोळला झाला[५१] त्यांच्याशी तोंडातल्या द्राक्षाच्या फळासारखी चिपकली [५२] बबनची अवस्था कुसातून मोडल्या औतासारखी झाली[५३] घराची उदासी त्यांच्या पहिल्याचं भेगाळल्या मनात खोलवर झिरपत गेली. तापल्या भुईच्या पोटातं उन्हाच्या धारा जाव्यात तशी [५४] बबनच्या काळजाला चरका बसल्या सारखा झाला.[५५] जिथी उजेडाची भिती, तिथीचं लेकाचा दिवस उगवते.[५६] दीडा दिवसाची इंदरसभा चालू हाये [५७] सुखाच्या भरतीच्या लाटा दूर दूर ओसरूनं गेल्या. रिकाम मन धडकायला लागलं. [५८] सापाच्या तोंडून बाहेर आलेल्या बेडकीसारखं त्याला वाटतं होत.[५९] काळजावरून काव-या काटीची फांदी ओचकारतं नेल्यासारखं झाला.[६०] प्रत्येक माणूस गावातल्या कोरडया विहिरीतला काळा कातळ डोळयात गोठवून आपल्याशी बोलतो आहे.[६१] वावटळीचा गरका निघुन जावा तसे लोक शांत झाले.[६२] नकळत बैलाची शेवटी

दाबावी तशी त्याने बापाचा पाय दाबला.[६३] तो मनातून होरपळून गेलेल्या रानासारखा उजाड झाला.[६४] पाणी भेटणार या आशेनं गल्लीतले बायका माणसे नवती फुटल्या झाडासारखे टवटवीत झाले. होते.[६५] त्याच्या मनात दयेच्या लाटावर लाटा त्याला अनावर झाल्या.[६६] कधी कवडीचं सुख दिलं नांही तुह्याबापानं.[६७] भुकेले कुत्रे पंगती नंतरच्या उष्टया पत्रावळीवर तुटून पडावेत तसे बायका माणसं विहिरीवर तुटून पडले होते.[६८] सपाटून भूक लागलेल्या माणसाचं जेवण सुरू असावं, पण अर्ध्यातच त्याच्या पुढचं ताट कोणी उचलून न्यावं, तशी राघोजीची अवस्था झाली.[६९] सम्ध्या डोंगरालेचं आग लागली तिथी आता एक शिल्पी वाचवून काय करावं ? [७०] घर ना दार अन् चावडी बिराड.[७१] भुकेल्या कुत्र्यानी मेल्या ढोराच्या मढ्यावर धावतं सुटावं तशी गर्दी काठावर झेपावली.[७२] सुईणीचा पत्ता इचारूनं दिवस नसते ठेवूनं कोणी.[७३] तांब्याच्या बुडाने भाजल्या मिरच्यांचा ठेचा रगडावा तसा तो तिला हंड्याच्या बुडाखाली रगडू लागला.[७४] एकदम फासे पारध्यानं वापरलेल्या शिकारीवर झेपा टाकत यावे तसे आले.[७५] त्यो तुला बोंडीचा करदोडा अन् शेंडीचा नारळ देईन. हार तुरे घालुन तुपला सत्कार करील.[७६] बबनला आपल्या काळजात चोच खुपसल्यासारखा वेदना झाल्या.[७७] काळजावरुन काव-या बाभळीची, सुळकाटयाची फांदी कोणी तरी ओरबडतं नेल्यासारखी आग उठली.[७८] राज्य लुटून नेलेल्या राणी सारखी सैरभैर झाली होती.[७९] शेवाया लाटणाऱ्या पाटावर शेवाया सुटाव्यात, तशा त्याच्या अंगावरुन मळाच्या काळपट मळकट लोळ्या हातावर यायच्या[८०] मस्तकात मुंग्याच वारूळ फुटल्यासारखं वाटतं होत.[८१] चंद्राजवळ चांदणं

नाई अन् साखरेजवळ गोडी नाई.[82] या सर्व उपमा प्रतिभातून लेखकाची भाषा सौंदर्यपूर्ण तर होतेच, त्याचबरोबर तिला वाचनीयता लाभते. यातून लेखकाचे त्या भौगोलिक प्रदेशातील सूक्ष्म निरीक्षणही प्रत्ययाला येते.

म्हणी व वाक्यप्रचार :

सदानंद देशमुखांनी " तहान " कादंबरीत व-हाडी वाक्प्रचार आणि म्हणींच्या संबंध कादंबरीत वापर करतात. या म्हणी, वाक्यप्रचार निवेदनाच्या संवादाच्या प्रवाहात सहजपणे येतात. त्यामुळे त्या नैसर्गिक भाषेची गरज बनल्याची दिसतात. या कादंबरीत खालील वाक्यप्रचार येतात.

उदा. वाकळीतले पाय साकळीत आले.[83]

काम सरो अन् वैद्य मरो.[84]

ये घेरा अन् बैस पाठकुळी.[85]

म्हणी :

नांदा सावे अन् कांदा चावे.[86]

घरची म्हणते बया बया..अन् बाहीरचीले चोळी शिवा.[87]

पाण्यातं काडी मारुनं काने आलक व्हते.[88]

घरची करती देवा देवा, अन् बाहीचीले चोळी शिवा.[89]

गोड बोली दपेर तोली.[90]

पुणे लुटूनं साता-याला दान.[91]

बाप तसा लेक अन् उंबरठयाची टेक.[९२]

सातारा लूटून पुण्याला दान.[९३]

भुताच्या घरात सुताच्या वाती.[९४]

ज्याच्या हाती ससा त्योच पारधी.[९५]

आयत्या बिळावरचे नागोबा.[९६]

उघडयापाशी नागडं गेल अन रातसारी हिवान मेल.[९७]

या वाक्यप्रचारामुळे व म्हणींच्या वापराने "तहान" ची भाषा समृध्द बनलेली दिसते.

**" तहान " कादंबरीचे प्रादेशिक साहित्याच्या दृष्टीने मूल्यमापन**

" तहान " या कादंबरीचे प्रादेशिक दृष्टिकोनातून मूल्यमापन करावयाचे आहे. प्रादेशिक साहित्याविषयी गो.मा. पवार लिहितात. " विशिष्ट प्रदेशातील निसर्ग, सामाजिक सांस्कृतिक परंपरा, लोकाची जीवनपध्दती आणि त्याची भाषा यामुळे विशिष्ट भूप्रदेशाची प्रादेशिकता प्रगट करणा-या साहित्याला आपण अवघड प्रादेशिक साहित्य म्हणतो ".[९८] साहित्याची प्रादेशिकता ठरविताना तेथील निसर्ग, समाज, सांस्कृतिक परंपरा जीवनपध्दत व भाषा पध्दत इत्यादी महत्वाचे घटक असतात हे घटक असतील तरच त्या साहित्यकृतीला प्रादेशिक साहित्य म्हणता येईल. प्रादेशिक कादंबरीविषयी आपले मत व्यक्त करताना आनंद यादव लिहितात. " एखाद्या विशिष्ट प्रदेशातील लोकजीवन, संस्कृती, परंपरा, जीवन संकेत, रीती, समूह जीवनातील भाव-भावना आणि या सर्वातून निर्माण झालेल्या समस्या आणि जीवनभाष्ये यांचे दर्शन घडविण्याच्या उद्देशाने ज्या

कादंबऱ्या लिहिल्या जातात त्यांना प्रादेशिक कादंबऱ्या म्हणतात[१९] या व्याख्याच्या आधारे " तहान " या कादंबरीचे मूल्यमापनकरु

१. कादंबरीतील भूप्रदेश :

" तहान " या कादंबरीत संपूर्ण प्रादेशिक पट्टा दिसून येतो. " तहान " कादंबरीत चिखली, बुलढाणा, अकोला विदर्भातला संपूर्ण भूप्रदेशाचा पट्टा येतो. त्याचं पार्श्वभूमीवर ही कादंबरी उभारली आहे.

२. लोकजीवन :

३. व्यवसाय

४. रहाणीमान, दारिद्र्य

५. पोषाख

६. भाषा

२. लोकजीवन :

पाण्याच्या अभावामुळे संबंध गावचे दैनंदिन जीवन विस्कळित होताना दिसते. पिण्यासाठी पाणी नसल्यामुळे गावाची सामाजिक व्यवस्थाच पूर्णपणे ढासळते. ढासळणाऱ्या ग्रामीण जीवनाचे सूक्ष्म चित्रण सदानंद देशमुखांनी " तहान" मध्ये केले आहे. पिण्याच्या पाण्यामुळे गावचे जीवन ग्रामव्यवस्थेत अनेक परिवर्तने होतात. माणसांची मन बदलतात. प्रवृत्ती बदलतात. सामाजिक जीवनाचे सर्वच आधार कोसळतात. आदरतिथ्य, पाहुणपण, नातीगोती, भावबंध, असे सर्व मानवीय संबंधाचे धागे कलथून जातात. उरते फक्त मानवातील पशुत्व.

लोकजीवन सदानंद देशमुख चित्रित करतात.

३. व्यवसाय :

"तहान" कादंबरीत सारंगपूर नावाचे एक प्रातिनिधिक खेडेगाव आहे. गाव महामार्गाला जोडलेले असल्यामुळे शहरी संस्कृतीच्या छायेत विसावले आणि कालानुरूप बदल स्वीकारणारे आहे. गावातच लोक लहान-लहान व्यवसाय करताना दिसतात.

व्यवसाय करणाऱ्या लोकांचे चित्रण लेखक करताना दिसतो.

४. राहणीमान :

पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मांडताना अनेक सूक्ष्म बारकावे सदानंद देशमुखानी टिपले आहेत. पाणी समस्येमुळे ग्रामीण जीवनाचा पायाच कोलमडून पडतो आणि संबंध जीवन व्यवस्था आणि कृषी व्यवसथा कोसळून पडते.

ग्रामीण भागातील पाण्याच्या ज्वलंत समस्येबरोबरचं माणसाचा स्वार्थ, एकमेंकाचे द्वेष, आमदार, खासदार यांचा ढोंगीपणा, हे सर्व लेखकाने प्रत्ययकारकपणे रंगविले आहे.

५. पोशाख :

विदर्भातल्या ग्रामीण जीवनाचा वेध घेण्याचा प्रयत्न देशमुखांनी केलेला आहे. शेतमजूर, शेतकरी, भूमीहीन, त्यांची मूल-ग्रामीण व्यवस्थेत निरनिराळ्या समस्यांना तोंड देत जगण्यासाठी संघर्ष करतात. याचे चित्रण लेखक करतो.

६. भाषा :

विदर्भातिल्या व-हाडी बोलीला प्राधान्य देऊन ग्रामीण जीवनाचा वेध घेण्याचा प्रयत्न लेखकांने केलेला आहे. " तहान " या कादंबरीत येणारी भाषा ही गावागावातून खेड्यातून बोलली जाणारी बोलीभाषा आहे. विदर्भातिल्या चिखली-बुलढाणा या प्रदेशातील वैशिष्ट्यांच कौशल्याने लाभोले आहे. त्यामुळे सर्वसाधारणपणे या वातावरणाशी व या बोलीभाषेशी परिचित असणारा वाचक खिळून जातो आणि तिच्या अंगभूत गोडव्यात विरघळून जातो.

भौगोलिक दृष्टया कादंबरीचे चित्रण झाल्यामुळे " तहान " ही प्रादेशिक कादंबरी ठरते.

सारांश :

सदानंद देशमुखांनी " तहान " कादंबरीत खास व-हाडी बोली भाषेचा वापर केला तसाचं, बोली आणि शैलीचा वापर केला. लेखक ज्या परिसरात राहतो त्या परिसरांच्या जीवनाशी आणि भाषेची नाळ जुळलेली दिसते, पिण्याच्या पाण्याच्या समस्येभोवती कथानक फिरताना दिसते.

संवादाची आणि निवेदनाची भाषा व-हाडी आणि प्रमाण असली तरी निवेदनातही खास व-हाडी शब्दाचा भरणा आहे. ढुंगर, बच्चकडोणा, चिंधीचाथा आदी. व-हाडी वाक्प्रचार आणि म्हणींचा तर संबंध कादंबरीत भरपूर वापर केला आहे बुलडाण्याकडची खास म्हणी-तुपली व-हाडी भाषा वापरल्यामुळे कादंबरी लक्षवेधी झाली आहे.

" लहान " कादंबरीतील भाषाशैलीचा अभ्यास केला असता असे दिसते की निवेदनासाठी व संवादासाठी प्रादेशिक भाषेचा वापर केला आहे. " लहान " कादंबरीतील घटना, प्रसंगातून चित्रमय शैली, जाणवते. तर समुदाय वर्णनातून प्रत्येक पात्राकडे बघण्याची निरीक्षणवृत्ती दिसते. अंतरंग चित्रण करणारी भाषाही आढळते. लोकस्वभाव, बोलण्याची पध्दत हे संवादातून कळते. " लहान " कादंबरी समस्याप्रधान आहे.

## प्रकरण पाचवे

### संदर्भ ग्रंथ


| | | | |
|---|---|---|---|
| १. | देशमुख, | सदानंद | " तहान " कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे १९२८, प्र. आ. पृ. ८२. |
| २. | तत्रैव | | तत्रैव पृ. १२० |
| ३. | तत्रैव | | तत्रैव पृ. १०१ |
| ४. | तत्रैव | | तत्रैव पृ. ५८/५९ |
| ५. | तत्रैव | | तत्रैव पृ. ५३ |
| ६. | तत्रैव | | तत्रैव पृ. ७ |
| ७. | तत्रैव | | तत्रैव पृ. ४९ |
| ८. | तत्रैव | | तत्रैव पृ. ५ |
| ९. | तत्रैव | | तत्रैव पृ. १४ |
| १०. | तत्रैव | | तत्रैव पृ. २७ |
| ११. | तत्रैव | | तत्रैव पृ. ३९ |
| १२. | तत्रैव | | तत्रैव पृ. ४ |
| १३. | तत्रैव | | तत्रैव पृ. ३१ |
| १४. | तत्रैव | | तत्रैव पृ. ३ |
| १५. | तत्रैव | | तत्रैव पृ. ७ |
| १६. | तत्रैव | | तत्रैव पृ. ७ |
| १७. | तत्रैव | | तत्रैव पृ. २ |
| १८. | तत्रैव | | तत्रैव पृ. ९ |
| १९. | तत्रैव | | तत्रैव पृ. २१ |
| २०. | तत्रैव | | तत्रैव पृ. ३६ |

| | | |
|---|---|---|
| २१. | तत्रैव | तत्रैव पृ. ३८ |
| २२. | तत्रैव | तत्रैव पृ. ४० |
| २३. | तत्रैव | तत्रैव पृ. ४४ |
| २४. | तत्रैव | तत्रैव पृ. ४७ |
| २५. | तत्रैव | तत्रैव पृ. ४८ |
| २६. | तत्रैव | तत्रैव पृ. ४९ |
| २७. | तत्रैव | तत्रैव पृ. ५४ |
| २८. | तत्रैव | तत्रैव पृ. ५४ |
| २९. | तत्रैव | तत्रैव पृ. ६९ |
| ३०. | तत्रैव | तत्रैव पृ. ६२ |
| ३१. | तत्रैव | तत्रैव पृ. ७० |
| ३२. | तत्रैव | तत्रैव पृ. ९७ |
| ३३. | तत्रैव | तत्रैव पृ. ११९ |
| ३४. | तत्रैव | तत्रैव पृ. १३१ |
| ३५. | तत्रैव | तत्रैव पृ. १५२ |
| ३६. | तत्रैव | तत्रैव पृ. १६१ |
| ३७. | तत्रैव | तत्रैव पृ. १६२ |
| ३८. | तत्रैव | तत्रैव पृ. १६२ |
| ३९. | तत्रैव | तत्रैव पृ. १६२ |
| ४०. | तत्रैव | तत्रैव पृ. १७० |
| ४१. | तत्रैव | तत्रैव पृ. १७४ |
| ४२. | तत्रैव | तत्रैव पृ. १७७ |
| ४३. | तत्रैव | तत्रैव पृ. १९९ |
| ४४. | तत्रैव | तत्रैव पृ. ८ |
| ४५. | तत्रैव | तत्रैव पृ. २० |
| ४६. | तत्रैव | तत्रैव पृ. २१ |
| ४७. | तत्रैव | तत्रैव पृ. २४ |

४८. तत्रैव तत्रैव पृ. २४

४९. तत्रैव तत्रैव पृ. २६

५०. तत्रैव तत्रैव पृ. ५५

५१. तत्रैव तत्रैव पृ. ५४

५२. तत्रैव तत्रैव पृ. ६५

५३. तत्रैव तत्रैव पृ. ६६

५४. तत्रैव तत्रैव पृ. ७०

५५. तत्रैव तत्रैव पृ. ७१

५६. तत्रैव तत्रैव पृ. ७१

५७. तत्रैव तत्रैव पृ. ९८

५८. तत्रैव तत्रैव पृ. १०७

५९. तत्रैव तत्रैव पृ. १०९

६०. तत्रैव तत्रैव पृ. ११२

६१. तत्रैव तत्रैव पृ. ११९

६२. तत्रैव तत्रैव पृ. ११९

६३. तत्रैव तत्रैव पृ. १३०

६४. तत्रैव तत्रैव पृ. १३७

६५. तत्रैव तत्रैव पृ. १३७

६६. तत्रैव तत्रैव पृ. १४०

६७. तत्रैव तत्रैव पृ. १४५

६८. तत्रैव तत्रैव पृ. १४८

६९. तत्रैव तत्रैव पृ. १५०

७०. तत्रैव तत्रैव पृ. १५२

७१. तत्रैव तत्रैव पृ. १५५

७२. तत्रैव तत्रैव पृ. १५६

७३. तत्रैव तत्रैव पृ. १६०

७४. तत्रैव तत्रैव पृ. १६०

| | | |
|---|---|---|
| ७५. | तत्रैव | तत्रैव पृ१६३ |
| ७६. | तत्रैव | तत्रैव पृ. १६९ |
| ७७. | तत्रैव | तत्रैव पृ. १६९ |
| ७८. | तत्रैव | तत्रैव पृ. १७३ |
| ७९. | तत्रैव | तत्रैव पृ. १७६ |
| ८०. | तत्रैव | तत्रैव पृ. १८३ |
| ८१. | तत्रैव | तत्रैव पृ. १९६ |
| ८२ | तत्रैव | तत्रैव पृ. ९ |
| ८३. | तत्रैव | तत्रैव पृ. १०५ |
| ८४. | तत्रैव | तत्रैव पृ. १२५ |
| ८५. | तत्रैव | तत्रैव पृ. ३१ |
| ८६. | तत्रैव | तत्रैव पृ. ९० |
| ८७. | तत्रैव | तत्रैव पृ. १४१ |
| ८८. | तत्रैव | तत्रैव पृ. १४३ |
| ८९. | तत्रैव | तत्रैव पृ. १६७ |
| ९०. | तत्रैव | तत्रैव पृ. १७२ |
| ९१. | तत्रैव | तत्रैव पृ. १७२ |
| ९२. | तत्रैव | तत्रैव पृ. १८३ |
| ९३. | तत्रैव | तत्रैव पृ. १९० |
| ९४ | तत्रैव | तत्रैव पृ. १९९ |
| ९५. | तत्रैव | तत्रैव पृ. १९९ |
| ९६. | तत्रैव | तत्रैव पृ. २०१ |
| ९७. | पवार, गो. मा. | साहित्यातील प्रादेशिक भाषा आणि विवेचन संब निबंध |
| ९८. | यादव आनंद | ग्रामीण साहित्य दिशा आणि अपेक्षा मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे पृ. ८० |

समारोप :

प्रस्तुत प्रबंधिकेत सदानंद देशमुख यांच्या " तहान " या कादंबरीचा चिकित्सक शोध घेतला आहे. " तहान " ही कादंबरी ग्रामीण साहित्याच्या प्रवाहात वैशिष्ट्यपूर्ण ठरणारी आणि महत्वपूर्ण कादंबरी आहे. या कादंबरीचा चिकित्सक अभ्यास करून तिच्या विविधांगी वैशिष्ट्यांचा शोध घेणे गरजेचे असल्याचे जाणवते. त्यामुळे या प्रबंधिकेत प्रस्तुत कादंबरीचा सर्वांगीण अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

या अभ्यासाला समर्पकता प्राप्त व्हावी म्हणून खालीलप्रकारे अभ्यासाच्या सोयीसाठी प्रकरणे केलेली आहेत.

१. सदानंद देशमुख पूर्व मराठी ग्रामीण कादंबरी.
२. "तहान"ची संरचना.
३. "तहान" मधील व्यक्तिरेखा.
४. " तहान" मधील जीवनचित्रण.
५. "तहान " मधील भाषाशैली.

सदानंद देशमुख पूर्व मराठी ग्रामीण कादंबरी या पहिल्या प्रकरणात "ग्रामीण साहित्य" या संकल्पनेचा विचार केलेला आहे. ग्रामीण साहित्य ही संकल्पना आणि प्रादेशिक साहित्य ही संकल्पना स्पष्ट करून त्यातील सीमारेषा स्पष्ट करण्याचा प्रयत्न या प्रकरणात ग्रामीण साहित्याचे समीक्षक आनंद यादव, गो. मा. पवार, नागनाथ कोत्तापल्ले, द. ता. भोसले यांच्या विवेचनाच्या आधारे स्वरुप स्पष्ट केले आहे

ग्रामीण साहित्याची सुरुवात १८८५ च्या सुमारास मानली जाते. या साहित्याला १९६० नंतर खरा बहर आला. साठनंतर तो ग्रामीण परिसरात नवशिक्षितांचा वर्ग तयार झाला, त्यात विविध स्तरातील लेखकांने आपले ग्रामीण परिसरातील आपले अनुभव कादंबरीबध्द केल्याने त्या अनुभवात अधिक जिवंतपणा आला. या कादंब-यातून प्रामुख्याने खेडयातील पारंपरिक व्यवसाय, कष्टकरी, भटके, आणि दलित यांचे दुःख चित्रणावर भर दिलेला असल्याने संपूर्ण ग्रामीण संवेदना शब्दांकित करण्यात साठनंतरची कादंबरी यशस्वी झालेली दिसते. त्यात उध्दव शेळके, शंकर पाटील, रणजित देसाई, आनंद यादव, रा. रं. बोराडे, ना. धो. महानोर, हमीद दलवाई इत्यांदीच्या विशेषत्वाने निर्देश करावा लागतो.

अशा विविध वळणानी ग्रामीण कादंबरीची पूर्वपिठीका संपन्न असल्याचे दिसते. अशा प्रकारे ग्रामीण कादंबरीच्या उगमापासून ते सदानंद देशमुख यांच्या ग्रामीण कादंबरीने कसा प्रवास केला, कोणती वळणे घेतली याचा प्रमुख लेखकांच्या आधारे आढावा घेतला. अशा त-हेने पहिल्या प्रकरणांत कादंबरीचे स्वरुप आणि ग्रामीण साहित्याचे विशेष याचा विचार केला.

दुस-या प्रकरणामध्ये सदानंद देशमुखांच्या " तहान" कादंबरीची संरचना आशयसूत्रांच्या आधारे पाहिली आहे यामध्ये मुख्य आशयसूत्र व उपआशय सुत्रे यांची मांडणी करून कादंबरीची संरचना अभ्यासली. मुख्य आशय सूत्र " खेडयातील पाणी टंचाई व उपआशय सूत्रे १. भौतिक सुखाच्या मृगजळामागे लागलेली खेडयातील तरुण पिढी २. जुन्या-नव्या पिढीतील संघर्ष ३. नागरी संस्कृतीचे गावावर होणारे सर्वव्यापी आक्रमण ४. रत्ना व मदन या दोघामध्ये निर्माण झालेले नाते ५. ग्रामीण भागातील लोकांची सुखाची तहान ६. शिवार-शेती, गुरे-ढोरे, पशु-पक्षी, यांना अभावग्रस्त परिस्थितीत सोसावी लागणारी

इळ ७. खेड्यातील व्यापाऱ्यांची मतलबी वृत्ती ८. पैशाची तहान लागलेल्या बबन शेवाळेच्या कुटुंबाची दुर्दशा ९. खेडे व तेथील राजकारणात सामान्य माणसांची भरड या आशयसूत्रांच्या अनुषंगाने " तहान " ची संरचना अभ्यासली आहे.

" तहान " ही दर्शनी समस्या प्रधान कादंबरी आहे. मुळातच ग्रामीण कादंबरीचे समस्या प्रधानता हे वैशिष्ट्यचं आहे. "तहान " ही सदानंद देशमुखांची पहिलीचं कादंबरी असल्यामुळे आणि सदानंद देशमुख मुळात कथालेखक असल्यामुळे यांच्यातील कथाकार कादंबरीत दिसतो. कादंबरी हा विस्तृत भाषिक अवकाश मांडणारा वाङ्‌मय प्रकार असतो. जीवनाचे आणि समाजाचे व्यापक आकलन कादंबरीत मांडावे लागते. शिवाय कादंबरी हा लवचिक वाङ्‌मय प्रकार असतो. कादंबरीची आशयसूत्रे अनेकपदरी असावी लागतात. तहान कादंबरीचा आवाका चिंचोळा आहे. आशयसूत्रे वर्तुळ छेदणारी नाहीत. शिवाय पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मांडताना अनेक सूक्ष्म बारकावे टिपले आहेत. पाणी समस्येमुळे ग्रामीण जीवनाचा पायाच कोसळून पडतो आणि संबंध जीवन व्यवस्था आणि कृषी व्यवस्थाचं मोडून पडते असे चित्रण सदानंद देशमुखांना करता आले असते परंतु कथालेखनाच्या प्रदीर्घ अनुभवामुळे " तहान " सुध्दा दीर्घकथेच्या कक्षा ओलांडताना दिसत नाही.

गावातील राजकारण, गटबाजी, स्वार्थी नेतृत्व, अधिकाऱ्यांचा भ्रष्टाचार आदी बाजूंचा वेध घेत असतानाचं नागरी संस्कृतीचे गावावर होणारे सर्वव्यापी आक्रमणही सदानंद देशमुखांनी दाखवले आहे. राधोजी आणि बबन अशा दोन पिढ्यांचा संघर्षही बदलत्या ग्रामीण वास्तवात नेमकेपणाने टिपण्यात देशमुखांना यश आले आहे. त्यामुळे ह्या कादंबरीची संरचना वैशिष्ट्यपूर्ण बनलेली आहे.

त्यानंतर तिस-या प्रकरणामध्ये " तहान " मधील व्यक्तिरेखांचा अभ्यास केला आहे. " तहान " मधील व्यक्तिरेखांचा अभ्यास करताना सोयीसाठी खालील विभागणीचा आधार घेतलेला आहे
१. कष्ट करणा-या व्यक्तिरेखा २. लघु-उद्योग करणा-या व्यक्तिरेखा ३. स्त्री व्यक्तिरेखा ४. भौतिक सुखाच्या मागे लागलेल्या व्यक्तिरेखा ५. पत्रकार म्हणून जगणारी व्यक्तिरेखा ६. ग्रामीण भागातील उठाठेव करणा-या व्यक्तिरेखा ७. पोलीसांच्या व्यक्तिरेखा ८. सामान्य माणसांच्या व्यक्तिरेखा. या मुद्याच्या अनुषंगाने विविध पात्रांचा परिचय, स्वभाव व वैशिष्टयानुसार करुन दिलेला आहे. त्यांच्या सर्व लकबीसह चितारलेली आहेत त्यांचा आढावा घेतलेला आहे.

कष्ट करणा-या व्यक्तिरेखांमध्ये शेती जीवनाशी एकनिष्ट, परंपरावादी आणि बदलत्या परिस्थितीशी तडजोड न करणारी व्यक्तिरेखा राघोजी शेवाळे आहे. मुरल्या"ढबिल्या ही बैलजोडी अत्यंत ताकदीने रेखाटलेली आहे.

लघुउद्योग करणा-या व्यक्तीरेखामध्ये मुख्य व्यक्तिरेखा बबन शेवाळे आहे. बबन अभावग्रस्त कुटूंबात जन्मलेला नायक आहे. परिस्थिती जुळवून घेताना अनेक कष्ट सोसावे लागतात. त्यांच्या मुळातल्या चांगुलपणाची कदर होत नाही. म्हणून व्यवस्थेचा त्याच्या मनावर सतत दबाव येतो आणि मार्ग सापडत नाही म्हणून घर सोडून जातो. बबन सारखे अनेक तरुण सतिश, प्रमोद, भुसारी होगे, हॉटेलवाले ढाबेवाले लघुउद्योग करून या व्यक्तिरेखा ग्रामीण भागात जगताना पाहिल्या आहेत.

स्त्री व्यक्तिरेखात बदलत्या परिस्थितीशी तडजोड करणारी, आपल्यांच स्वार्थात रंगून जाणारी रामकोर देशमुखांनी रेखाटलेली आहे. वर्षा, रत्ना यासारख्या स्त्री व्यक्तिरेखा पाहिल्या.

भौतिक सुखाच्या मागे लागलेल्या व्यक्तिरेखांमध्ये बबन, प्रमोद, सोमनाथ, मोहन सारखे तरुण रत्नासारखी व्यक्तिरेखा भौतिक सुखाच्या मागे लागून जुने सर्व नाकारून जगताना दिसतात. यांच्या चित्रणातून नव्या पिढीच्या अनेक समस्या देशमुख शब्दबध्द करतात.

ग्रामीण भागात उठाठेव करणाऱ्या व्यक्तींचा एक स्वतंत्र गट असतो यांच्या उठाठवी गावच्या समूह जीवनावर परिणाम करीत असतात. त्यामुळे गावचे वातावरण ढवळून निघते. " तहान " मध्ये पाणी टंचाईवर मात करण्यासाठी भिमराव शेंपडेचे राजकारण सुरु होते. यातून गावातून नवेच ताण निर्माण होतात. याचे चित्रण देशमुख करतात.

सामान्य माणसं दुबळी, दुष्काळाच्या चाहुलींने शहारलेली, कोरड्या उष्ण वातावरणात माणसांची मनही कोरडीठण्ण, वांझोटी, निबर, झालेली दिसतात. ग्रामजीवन, कृषीकेंद्री वातावरण यातून हे तहानलेले कोरडेठण्ण विश्व जाणवते. या सामान्य माणसांचे चित्रणही देशमुख सहानुभावाने करतात. प्रकरणाच्या शेवटी देशमुख यांच्या व्यक्तिचित्रणाची वैशिष्टये नोंदवली आहेत.

चौथ्या प्रकरणात " तहान " मधील जीवनचित्रणाचा अभ्यास करताना १. माणसामाणसातील विसंवाद २. ग्रामजीवनातील उतरंडी ३. कोरड्या उष्ण वातावरणात जगता जगता माणसांची मन. ४. राजकारण अर्थकारण-समाजकारण जातीयवृत्ती ५. तहान आणि पाणी समस्या या मुद्याच्या आधारे जीवन चित्रणाचा विचार केला आहे.

"तहान " कादंबरी शोकात्मिका आहे पण ती एका माणसाची शोकात्मिका नाही. ती ग्रामीण जीवनाच्या मूल्याचे, पडझडीचे चित्र रेखाटते. माणसामाणसातील विसंवादाचे, पैसा-चैन-स्वार्थ यातील ओढीमुळे त्यातच रूतत जाणाऱ्या माणसाचे विश्व रेखाटते.

राघोजी, बबन, रामकोर, वर्षा यांच्या कुटुंबचित्राला भिमराव शेंडेचे राजकारण, शिकलेल्या प्रमोदचे अर्थकारण, गावभरातल्या बातम्या गोळा करणाऱ्या मोहनची मतलबी वृत्ती, होगेच्या दुकानातली व्यापारीवृत्ती, दलालापायी नोकरी न मिळालेला ततिशा-कुरूप पोरीशी लग्न करुन जीवनात धडपड करणारा... या साऱ्यांच्या आयुष्याचे ताणेबाणे विणत दीर्घ माणूसपड सदानंद देशमुखांनी विणला आहे.

माणसाच्या मनाचा गुंता, तरूणपणातील शरीराची ओढ, हातात अवचित पैसा आल्यामुळे येणारी मस्ती या कादंबरीत साकारते. निसर्गाच्या अवकृपेला राजकारण-अर्थकारण -समाजकारण, जातीयवृत्ती यातून निर्माण झालेले कोरडे हातपंप, डबक्यासारख्या विहिरी यांचे अस्तर लाभले आहे ही तहान फक्त पाण्याची नाही, ती पैशाची, स्वप्नांची, तळमळीची, मायेची कधी कधी सुडाची तहान आहे. एकच तहान वेगवेगळया पातळीवर न्याहळताना कादंबरीचा खरा कस जाणवतो.

ग्रामजीवन, कृषीकेंद्री वातावरण यातून हे तहानलेले कोरडेठण्ण विश्व जाणवते. आई असून पैसा आणणाऱ्यावर मायेचा वर्षाव करणारी रामकोर, टी.व्ही. टेपरकार्डर या स्वप्नात दंग होत तारूण्य दवडणारी वर्षा, गावातला शिकूनही नोकरी न मिळालेला प्रमोद नवले, मॅट्रीक न होता गावच्या पंचायती करणारा मोहन पोलीस आलेला सोमनाथ, बैलावर प्रेम करणारा शेती हाच धर्म जपणारा-माणसं बदलली म्हणून रडणारा राघोजी, पाण्यासाठी तरूण मुलगी गमावली म्हणून आक्रोशणारी आई, गुरढोर वांग्यागत होऊन मेली आणि पाणी नाही म्हणून आग विझली नाही. हे झोंबून घेणार गाव यातून ग्रामजीवनातील साऱ्या उतरंडी उभारल्या जातात. स्वप्न पाहणारे, स्वप्न पाहण्याचे बळ न उरलेले, स्वप्नांना गाडून अंध जगणारे असे सारेच या जगण्यात जीव लावतात. त्या

ताणयाबाणयातून अवतरते. शेती, बैल, पाणी, जमीन यांचे असलं ग्रामीण विश्व. प्राणयांवर प्रेम करणा-याचे, त्यांना वापरले तरी त्यांच्या हालामुळे कळवळणा-याचे वेगळे जग त्यातही लेखकाला माणसांच्या मनाचे चित्र अधिक मोलाचे वाटते. बबनसारखा तरुण आधी पैसा, मग स्त्री सुख अशा भौतिकसुखाच्या मृगजळामागे धावतो, आपले ग्रामजीवन, आपली कृषीसंस्कृती, विसरुनं कचकड्याच्या शोभिवंत चकचकीत जगामागे धावतो आणि शेवटी त्याच्या वाट्याला येते फक्त अपयश, जगणयाची, पैशाची कोंडी, स्वार्थापोटी चिकटणारी बांडगुळाची दुनिया आणि त्याला नवे सगळे फेकून धावे लागते पुन्हा जुन्या जगाशी सोयरीक जुळवावी लागते. अशा प्रकारे ग्रामीण जीवनाचे सर्व ताण-तणावासह देशमुखांनी चित्रण केले आहे.

यानंतर पाचव्या प्रकरणात " तहान " मधील भाषाशैलीचा अभ्यास केला आहे. कादंबरीत संवादासाठी व निवेदनासाठी प्रादेशिक भाषा शैलीचा वापर केला आहे. कादंबरीतील वाक्यरचना साधी, सरळ व सोपी आहे. सुटसुटीत वाक्यरचना दिसून येते. एखादया घटनेचे वर्णन करताना ती घटना संपूर्णपणे आपल्या डोळयासमोर चित्र उभे करुन चित्रित केली आहे, त्यामुळे चित्रण शैली दिसून येते. समुदायाचे वर्णन, समुदायातील प्रत्येक व्यक्तीची हालचाल, सांगितलेली आहे कोणती व्यक्ती काय करते हे ही सांगितले आहे यातून लेखकाची बघणयाची निरीक्षण शक्ती दिसून येते

संवाद लेखनातून मानवी स्वभाव, सामाजिक प्रश्न, बोलणयाची पध्दत दिसून येते. संवादलेखन करताना एखाद्या संवादाची सुरुवात व त्या संवादाची शेवटची पातळीपर्यंत संवादातील आशय पूर्ण होतो. प्रसंगानुरुप संवाद कसे बदलत जातात. उदा. बाप-मुलगा संवाद, मित्रा-मित्रातील संवाद, स्त्री-स्त्रीतील संवाद, यातून स्पष्टपणे दिसून येतात.

प्रसंगानुरूप शिव्या उदा. मायमी हया बबन्याच्या, हरामखोर, काळजिभ्या, लेका, साल्या इ., म्हणी उदा. नांदा लावे अन् कांदा खावे, घरची म्हणते बया बया अन् बाहिरीचीले चोळी शिवा, भुताच्या घरात सुताच्या वाती, पुण्यं लुटून साता-पाला दान, बाप तसा लेक अन् उंबरठ्याची ठेक, वाक्प्रचार- वाकळीतले पाय साकळीत, काम सरो अन् वैद्य मरो, ये घेरा अन् बैस पाठकुळी, - विदर्भातील खास मपली-तुपली भाषा यांचा वापर केलेला आहे. त्यामुळे लेखकाची शैली वैशिष्ट्यपूर्ण बनते.

" तहान " कादंबरी संरचना, व्यक्तिचित्रण, जीवनचित्रण आणि भाषाशैली या दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण ठरते. हया कादंबरीने मराठी ग्रामीण कादंबरीत मोलाची भर घातली आहे.